https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २०९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १८ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २०९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १८ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राहुल गांधी यांचा सर्वात मोठा आरोप; मतचोरीचा पुरावा देत 'त्या' लोकांना थेट स्टेजवर बोलावले अन्...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली**

केंद्रीय निवडणूक आयुक्त मतचोरीला संरक्षण देत आहेत. विरोधकांची नावे मतदार यादीतून वगळली जातात. त्यात प्रामुख्याने दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक समुदायाची नावे हटवण्यात आली. कर्नाटकच्या आळंद येथे ६०८० मते वगळण्यात आली. मतदारांची नावे जाणुनबुजून यादीतून काढण्यात आली. ज्यांच्या नावाने ही नावे काढली त्यांनाही याची कल्पना नाही. आळंदमध्ये याहून अधिक मते वगळली गेली असतील परंतु आम्ही ६ हजार मतदार काढले. इतर राज्यातील



मोबाईल नंबर वापरून कर्नाटकातील मतदार यादीतून काढले गेले असं सांगत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आजच्या पत्रकार परिषदेत जोरदार हल्लाबोल केला.


राहुल गांधी पत्रकार परिषदेत म्हणाले की, भारताचे केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार लोकशाही उद्ध्वस्त करणाऱ्या यंत्रणेला मदत करत आहेत. मी लोकसभेचा विरोधी पक्षनेता म्हणून ही जबाबदारीने माहिती शेअर करत आहे. आम्ही पुराव्यासह या गोष्टी मांडत आहोत. १००० टक्के आम्ही सर्व पडताळणी करून या गोष्टी समोर आणत आहोत. भारताची लोकशाही वाचवणं हे आमचे कर्तव्य आहे. कर्नाटकातील आळंद मतदारसंघात ६०८० मतदारांची नावे वगळण्यात आली. कुणीतरी जाणुनबुजून हे करत होते. पूर्ण निवडणूक प्रक्रिया हायजॅक करण्यात आली असा आरोप करत राहुल गांधी यांनी वगळण्यात आलेल्या मतदारांनाच स्टेजवर आणले.

कर्नाटकातील आळंद येथे गोदाबाई नावाच्या महिलेचे नाव मतदार यादीतून काढण्यात आले. विविध १२ लोकांकडून हे नाव वगळण्यासाठी अर्ज केले गेले. संबंधित महिलेला याबाबत काहीच माहिती नव्हते. मतदार यादीतून नावे वगळण्यासाठी वेगवेगळे मोबाईल नंबर वापरण्यात आले. बबिता चौधरी नावाच्या महिलेचे नाव मतदार यादीतून काढले गेले. सूर्यकांत नावाच्या व्यक्तीच्या मोबाईलवरून १२ लोकांची नावे वगळण्यासाठी मेसेज केले. त्यावर राहुल गांधी यांनी सूर्यकांत यांनाच स्टेजवर आणले. त्यावेळी त्यांनी माझ्या नावाने १२ लोकांची नावे वगळण्यात आली. मी कुणालाही मेसेज केला नव्हता असं सूर्यकांत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

दरम्यान, कर्नाटक सीआयडीने यावर गुन्हा दाखल केला. त्यानंतर १८ वेळा निवडणूक आयोगाला पत्र पाठवले. परंतु निवडणूक आयोगाने त्यावर एकदाही उत्तर पाठवले नाही. ज्या ज्या बूथवर काँग्रेस मजबूत आहे. तिथे मतदारांची नावे वगळण्यात येत होती. निवडणूक आयोगाने हा पूर्ण तपास रोखला. सॉफ्टवेअरच्या माध्यमातून अनेक मतदारांची नावे यादीतून काढण्यात आली.

## 'राहुल गांधींचा 'वोटचोरी'बाबतचा कांगावा म्हणजे', ते पत्र दाखवत भाजपाचा पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**



मतचोरीवरून आक्रमक झालेले काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आज कर्नाटकमधील आळंद आणि महाराष्ट्रातील राजूरा मतदारसंघात झालेल्या मतचोरीवरून गंभीर आरोप केले आहेत. दरम्यान, राजुरा मतदारसंघातील मतचोरीवरून राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांनंतर भाजपाने पलटवार केला असून, राहुल गांधींचा वोट चोरी आरोपाचा कांगावा म्हणजे 'उलटा चोर कोतवाल को डांटे' चा प्रत्यक्ष पुरावा आहे, असा टोला भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी लगावला आहे. तसेच राहुल गांधी आणि त्यांच्या पोलिटिकल पिलावळीनेच मतदार नोंदणीत बोगस नावे घुसवून आयोगाची दिशाभूल केली नाही ना, अशी शंकाही उपाध्ये यांनी उपस्थित केली.

केशव उपाध्ये म्हणाले की, राहुल गांधींचा वोट चोरी आरोपाचा कांगावा म्हणजे 'उलटा चोर कोतवाल को डांटे' चा प्रत्यक्ष पुरावा आहे. कर्नाटकातील आरोपाचे नाटक पुरते पडले आणि महाराष्ट्रातील मतदानाच्या नावाने थयथयाट करून मतदारांचा अपमान करत देशाला मूर्ख बनविण्याचा बनावही उघडा पडला.निवडणूक आयोगाच्या आव्हानास सामोरे जाण्याऐवजी तोंड लपवून पोरकटपणा करणाऱ्या राहुल गांधी आणि त्यांच्या पोलिटिकल पिलावळीनेच मतदार नोंदणीत बोगस नावे घुसवून आयोगाची दिशाभूल केली नाही ना, याची चौकशी करण्याची आता आम्हीच मागणी करत आहोत, असेही केशव उपाध्ये म्हणाले.

## निवडणूक आयोगाने आधारहीन म्हणत राहुल गांधींचे आरोप फेटाळले

### स्पष्टीकरणासह त्या दाव्यातील हवाच काढली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आज मतचोरीच्या मुद्यावरून निवडणूक आयोगावर आणखी गंभीर आरोप केले. तसेच कर्नाटकमधील आळंद विधानसभा मतदारसंघात मतदारांची कापलेली नावं आणि महाराष्ट्रातील राजुरा मतदारसंघात वाढवलेली मतदारसंख्या याबाबतचे पुरावे सादर केले. त्यानंतर आता भारतीय निवडणूक आयोगानेराहुल गांधींच्या आरोपांना तातडीने प्रत्युत्तर देत राहुल गांधींचे आरोप फेटाळून लावले. राहुल गांधी यांनी केलेले आरोप खोटे आणि बिनबुडाचे असल्याचा दावा निवडणूक आयोगाने केला. तसेच कॉल सेंटरच्या मदतीने मतदारांची नावं कापण्यात




आल्याचा राहुल गांधी यांनी केलेला आरोपही निवडणूक आयोगाने फेटाळून लावला असून, असं करणं शक्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना निवडणूक आयोगाने सांगितले की, राहुल गांधी यांनी केलेले आरोप चुकीचे आणि निराधार आहेत. राहुल गांधी यांनी जसा दावा केला आहे तशा पद्धतीने कुठल्याही मतदाराचं नाव कुठलीही सर्वसामान्य व्यक्ती ऑनलाइन पद्धतीने हटवू शकत नाही. कुठल्याही व्यक्तीचं नाव हटवण्यापूर्वी त्या व्यक्तीचं म्हणणं ऐकून घेतलं जातं, असा दावाही त्यांनी केला. २०२३ मध्ये आलंद विधानसभा मतदारसंघात मतदारांची नावं हटवण्याचे काही प्रयत्न झाले होते. या प्रकरणी निवडणूक आयोगाने स्वत: तक्रार दिली होती, अशी माहितीही निवडणूक आयोगाने दिली. दरम्यान, २०२३ साली झालेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत आलंद मतदारसंघात काँग्रेसचे बी.आर. पाटील विजयी झाले होते.

## मी रमी खेळत होतो कशावरून? मंत्री माणिकराव कोकाटेंनी रोहित पवारांना कोर्टात खेचलं, अब्रुनुकसानीचा दावा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नाशिक**

राज्याचे माजी कृषीमंत्री आणि सध्याचे माणिकराव कोकाटे हे गेल्या काही महिन्यांपासून जोरदार चर्चेत आहेत. सुरुवातीला त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे वरिष्ठ नेत्यांनी त्यांना समज दिली होती. त्यानंतर विधिमंडळात मोबाईलवर रमी खेळत असल्याचा व्हिडीओ समोर आल्यानंतर त्यांच्याकडून कृषीखाते काढून घेण्यात आलं. मात्र आपण मोबाईल रमी खेळत नव्हतो तर ती जाहिरात होती



असा दावा माणिकराव कोकाटे यांनी केला होता. विरोधकांनी हा मुद्दा लावून धरल्याने त्यांना मंत्रीपद सोडावं लागलं. त्यानंतर आता मंत्री माणिकराव कोकाटे यांनी त्या व्हिडीओवरुन कोर्टात धाव घेतली आहे.

सुमारे दीड महिन्यापूर्वी तत्कालीन कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी विधिमंडळात मोबाइलवर खेळत असल्याचा व्हिडीओ राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी व्हायरल केला होता. त्यावर ॲड. कोकाटे यांनी नाशिकच्या न्यायालयात आमदार रोहित पवार यांच्याविरोधात अब्रुनुकसानीचा फौजदारी दावा दाखल केला आहे. बुधवारी नाशिकच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत कोकाटे यांच्या वकिलांनी ते रमी होते कशावरून? तसेच व्हायरल व्हिडीओ मॉर्फ केला नसेल कशावरून, असा प्रश्न रोहित पवार यांना केला आहे.

कोकाटे यांनी नाशिकच्या न्यायालयात बदनामीचा फौजदारी दावा आपले वकील मनोज पिंगळे यांच्यामार्फत केला आहे. त्यावर बुधवारी पहिली सुनावणी झाली. यावेळी वकिलांनी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या संदर्भातील व्हिडीओ मॉर्फ केला गेला नसेल कशावरून, तसेच तो खेळ रमीचाच होता हे कशावरून आणि ते रमीच खेळत होते कशावरून, अशा प्रकारचे अनेक प्रश्न उपस्थित केले.

## अभिनेता आलोक नाथ,श्रेयस तळपदेवर गुन्हा दाखल; उत्तराखंडमधील घोटाळा प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

लोणी अर्बन मल्टी-स्टेट अँड थ्रिफ्ट कोऑपरेटिव्ह सोसायटी घोटाळ्याप्रकरणी रायपूर पोलिस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चित्रपट अभिनेते आलोक नाथ आणि श्रेयस तळपदे यांच्यासह इतर १३ जणांना या प्रकरणात आरोपी करण्यात आले आहे. हे दोन्ही अभिनेते फर्मचे ब्रँड ॲम्बेसीडर होते, असे यात म्हटले आहे.

चिट फंड कंपनी LUCC घोटाळ्यासंदर्भातील खटल्यावर उत्तराखंड उच्च न्यायालयात बुधवारी सुनावणी झाली. उत्तराखंड राज्यातील नागरिकांचे अंदाजे ८०० कोटी रुपये घेऊन चिट फंड कंपनीचे संचालक फरार झाले आहेत. या प्रकरणाची CBI (केंद्रीय तपास ब्युरो) कडून चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका उत्तराखंड उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याला न्यायालयाने मंजुरी दिली आहे.



तळपदेसह इतरांवर जो गुन्हा दाखल झाला आहे तो चिट फंडाच्या देहरादून कार्यालयाकडून फसलेल्या लोकांनी दाखल केला आहे. या चिटफंडाच्या कर्मचाऱ्यांनी विविध योजनांचे एजंट बनवून या लोकांकडून ६.२७ कोटी रुपये घेतले आणि कार्यालयाला टाळे ठोकून पसार झाले. या घोटाळ्याची तक्रार पंतप्रधान नरेंद्र मोदींपर्यंत गेली होती. सोसायटी ही भारत सरकार अंतर्गत नोंदणीकृत एक संस्था आहे. तिचे ब्रँड ॲम्बेसेडर चित्रपट अभिनेते आलोक नाथ आणि श्रेयस तळपदे आहेत.

आरोपींनी लोकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने तक्रारदारांची दिशाभूल केली आणि त्यांना एजंट बनवून पैसे गोळा करण्याची जबाबदारी सोपवली. या लोकांनी सोसायटीच्या सुकन्या योजना, आयुष्मान योजना, पेन्शन योजना, एफडी, एआयपी, शिक्षण योजना इत्यादींमध्ये गुंतवणूक करण्यासाठी ६.२७ कोटी गोळा केले होते. ते घेऊन ओरोपींनी पोबारा केला होता. या प्रकरणात या सोसायटीचे ब्रँड ॲम्बेसेडर चित्रपट अभिनेते आलोक नाथ आणि श्रेयस तळपदे यांचीही नावे नोंदविण्यात आली आहेत.

## शरद पवारांचा महाराष्ट्राला वेगळ्या दिशेने नेण्याचा प्रयत्न : चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

ओबीसी आणि मराठा उपसमितीवर भाष्य करताना, ऐक्य घडवायचे तर समित्यांत एकाच जातीचे लोक का? सरकारने इथे सामंजस्य निर्माण करून दोघात एकता करायला पाहिजे होती, असे मत शरद पवारांनी मांडले होते. शरद पवारांच्या या भूमिकेवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीका केली आहे. शरद पवारांचा महाराष्ट्राला वेगळ्या दिशेने नेण्याचा प्रयत्न सुरू असल्याची टीका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. सामाजिक तेढ निर्माण होणार नाही, यासाठी शरद पवारांनी काळजीपूर्वक बोलले पाहिजे, असेही ते म्हणालेत.



राज्य सरकारने हैदराबाद गॅझेज लागू केल्यानंतर ओबीसी संघटना आक्रमक झाल्या आहेत. याशिवाय बंजारा आणि धनगर समाजही हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देण्याच्या मागणीसाठी आग्रही असल्याचे दिसून येत आहे. यावर महाराष्ट्रातील सामाजिक वीण उसवत असल्याची प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली होती.

शरद पवार हे महाराष्ट्राला वेगळ्या दिशेने नेण्याचे काम करत असल्याचा आरोप महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. समाजात तेढ निर्माण होणार नाही, यासाठी पवार साहेबांनी काळजीपूर्वक बोलले पाहिजे. मराठा आणि ओबीसी समाजाच्या उपसमित्या समाजामध्ये एकरुपता आणण्यासाठी, समाज एकसंघ करण्यासाठी तसेच महाराष्ट्राला मजबूत करण्यासाठी आणि समाजातील तेढ कमी करण्यासाठी निर्माण करण्यात आल्या आहेत, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणालेत.

## रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी डॉक्टरांचा राज्यव्यापी संप : अमरावतीतही कडकडीत बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) आणि सर्व वैद्यकीय संघटनांच्या आवाहनानुसार आज (१८ सप्टेंबर) राज्यभरात संपाचे आयोजन करण्यात आले. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील खासगी दवाखाने, हॉस्पिटल्स पूर्णपणे बंद ठेवण्यात आले. अचानक बंदमुळे अनेक रुग्णांना मनस्ताप सहन करावा लागला. मात्र, जनतेला झालेल्या गैरसोयीबद्दल खच- तर्फे दिलगिरी व्यक्त करण्यात




आली आहे.

IMA च्या निवेदनानुसार, हा संप डॉक्टरांच्या स्वार्थासाठी नसून रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घेण्यात आलेला आहे. शासनाने होमिओपॅथी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या सीसीएमपी वैद्यांना अलोपॅथी उपचार करण्याचा परवाना दिला आहे. हा निर्णय धोकादायक असून, अलोपॅथीचे पूर्ण शिक्षण न घेतलेल्या वैद्यांकडून उपचार केल्यास रुग्णांच्या जीवाला धोका पोहोचू शकतो, असा खच- चा ठाम विरोध आहे.

डॉक्टर म्हणून आमची जबाबदारी फक्त उपचारापुरती मर्यादित नाही, तर सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्यसेवा नागरिकांपर्यंत पोहोचवण्याची आहे. त्यामुळेच आम्ही संपाच्या माध्यमातून शासनाला हा निर्णय मागे घेण्यासाठी जागृत करत आहोत, असे खच- ने स्पष्ट केले.संपादरम्यान तातडीच्या सेवा सुरू ठेवण्यात आल्या होत्या, मात्र नियमित वैद्यकीय सेवा बंद होत्या. खच- ने जनतेला आवाहन केले की, हा संप त्यांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी आणि भावी पिढ्यांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी यासाठी करण्यात आला आहे. या वेळी अमरावती शहरातील सर्व डॉ.एकत्र येत राज्य सरकारचा विरोधात त्रिव नाराजी व्यक्त केली

## संपादकीय ......

# पाकिस्तानचीच विकेट!

आर्थिक विकास, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य आणि कला व साहित्य यांपैकी कोणत्याही क्षेत्रात पाकिस्तान हा भारताशी बरोबरी करू शकत नाही. आज भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल करतोय आणि क्रीडा क्षेत्रातही अगदी थेट ऑलिम्पिकपर्यंत भारताने वाढत्या यशाची कमान कायम ठेवली आहे. भारतीय संघाने महत्त्वाच्या स्पर्धेत अनेकवेळा पाकिस्तान संघाला चारीमुंड्या चीत केले आहे. त्याची प्रचिती आशिया चषक स्पर्धेत आली आहे. अलीकडच्या काळात भारतीय क्रिकेट संघाच्या यशाची कमान वाढताना दिसत असताना आता तरुण तडफदार खेळाडूंनी कमाल करून दाखवली. रविवारी पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानवरील वर्चस्व कायम ठेवत भारतीय क्रिकेट संघाने आशिया चषक ट्वेंटी-ट्वेंटी स्पर्धेत सलग दुसर्या विजयाची नोंद केली.

कुलदीप यादव याच्यासह सर्वच फिरकी गोलंदाजांनी केलेल्या प्रभावी मार्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवच्या अप्रतिम फलंदाजीच्या जोरावर भारताने हा सामना ७ गडी आणि २५ चेंडू राखून जिंकला. पाकिस्तानचा भारताने धुव्वा उडवला. वास्तविक पहलगाम दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर भारताने यशस्वीपणे राबवलेले 'ऑपरेशन सिंदूर' याच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांतील संबंध पूर्णतः बिघडलेले आहेत. ही सर्व पार्श्वभूमी असल्यामुळे भारताने दुबईतील पाकिस्तानसोबत सामना खेळू नये, अशी मागणी देशातील बहुतांश विरोधी पक्षांकडून केली होती. पण केंद्र सरकारने आधीच परवानगी दिल्यामुळे आशिया चषकातील साखळी सामना ठरल्याप्रमाणे पार पडला.

एकीकडे रक्त आणि पाणी एकत्र वाहणार नाही, असे म्हणायचे आणि मग सामना ठेवायचा, हे कसे चालेल? पाकिस्तानसोबत अवघ्या दोन महिन्यांत क्रिकेट कसे खेळू शकता, असा प्रश्न शिवसेना उबाठा या पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला होता. काही लोकांनी भारताचा जगप्रसिद्ध भालाफेकपटू नीरज चोप्राला 'देशद्रोही' ठरवले होते. त्याच प्रकारे तुम्ही आयसीसीचे अध्यक्ष जय शहा यांनाही देशद्रोही म्हणणार का, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला होता.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे पुत्र जय शहा यांच्या दबावामुळेच हा सामना खेळला गेला असल्याचा आरोप केला जात आहे. वास्तविक या आरोपात कोणतेही तथ्य नाही. तरीही रविवारी उबाठाकडून 'माझं कुंकू माझा देश' हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला मनसे आणि काँग्रेसचीही साथ लाभली. केंद्र सरकारला 'ऑपरेशन सिंदूर'ची आठवण करून देण्यासाठी कुंकवाची डबीही पाठवली. ठिकठिकाणी पाकिस्तानच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या आणि पाकिस्तानसोबत कदापि क्रिकेट खेळता कामा नये, असे सांगण्यात आले.

पहलगाममध्ये मृत्यू पावलेल्या काहीजणांच्या कुटुंबीयांनीही सामन्यास विरोध केला होता आणि या भावनांचा केंद्र सरकारही आदरच करते. शिवाय पाकिस्तानशी क्रिकेट खेळणे म्हणजे 'ऑपरेशन सिंदूर' स्थगित करणे नव्हे. पाकिस्तानने यापुढे दहशतवादी कृत्ये केल्यास त्यांना यापूर्वीपेक्षाही अधिक भयंकर धडा शिकवू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले. पाकिस्तानबाबत भारताच्या कठोर पवित्र्यात कुठेही सौम्यता आलेली नाही. मार्च १९९७ मध्ये जगमोहन दालमिया यांची आयसीसीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि त्यायोगे प्रथमच एका भारतीय व्यक्तीस या शिखर संघटनेचे अध्यक्षपद भूषवण्याचा मान प्राप्त झाला. २८ ऑगस्ट २०२४ रोजी जय शहा यांची आयसीसीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. ज्या प्रतिष्ठित संस्थेचे नेतृत्व एक भारतीय व्यक्ती करतोय, त्या संस्थेचे नियम पाळणे, हे कर्तव्यच आहे. हे कर्तव्यपालन करताना पाकिस्तानबाबतच्या आक्रमक धोरणास अजिबात मुरड घातलेली नाही.

# मक्यात दाणे भरण्यासाठी, सोयाबीन, भुईमूंगाच्या शेंगा भरण्यासाठी काय करावे?

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

सद्यस्थितीत मका पीक दाणे भरणे ते पीक परिपक्वतेच्या अवस्थेत तर सोयाबीन पीक फुले लागणे ते शेंगा भरणेची अवस्थेत तसेच भुईमूंग पीक शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहेत. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी पुढील नियोजन काय करावे, हे समजून घेऊयात....

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**मका पीक** – मका पिकावरील अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ४ ग्राम प्रती १० लि. पाण्यात किंवा थायोमेथोक्झाम + ल्याम्बडा सायहेलोथ्रीन ३ मिली प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.

मका पिकास नत्र, स्फुरद, पालाश आणि गंधक या बरोबरच जस्त या अन्नद्रव्याचा वापर करणे पीक पोषणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

**सोयाबीन पीक**

सोयाबीनची अतिरिक्त कायिक वाढ रोखून उत्पादकता वाढविण्यासाठी, पीक फुले लागण्याच्या अवस्थेत असताना सायकोसील (क्लोरमेक्वॅट क्लोराईड ५० एसएल) या संजीवकाच्या ५०० पी.पी.एम. द्रावणाची (१ मिलि प्रति लिटर पाणी) फवारणी करावी.

सोयाबीनवरील हेलीकोव्हर्पा, उंट अळी व तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा नियंत्रणासाठी, क्किनालफॉस ०.२% किंवा प्रोफेनोफॉस ०.२% २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

तसेच सोयाबीनवरील खोडमाशीच्या नियंत्रणासाठी, फिप्रोनील ०.२% २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.




**भुईमुंगसाठी अन्नद्रव्य फवारणी**– भुईमुगाच्या शेंगा भरत असताना आकार व वजन वाढण्यासाठी सल्फेट ऑफ पोटॅश (०-०-५०) ७५ ग्रॅम अधिक मल्टी मायक्रोन्यूट्रिएंट ५० ग्रॅम प्रति १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.– **ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे अमरावतीत उद्घाटन

## उत्तमसरा येथून विभागीय आयुक्तांच्या हस्ते शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ राज्यात आजपासून करण्यात आला. अमरावती जिल्ह्यातील उद्घाटन भातकुली तालुक्यातील उत्तमसरा ग्रामपंचायतीत विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषद सीईओ संजिता महापात्र, वरिष्ठ अधिकारी, सरपंच व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान सेवा पंधरवाडा, राष्ट्रीय पोषण माह आणि स्वच्छता ही सेवा उपक्रम राबवले जातील. ग्रामपंचायतींनी एकत्र येऊन ग्रामविकास साधावा, असे आवाहन डॉ. सिंघल यांनी केले. जिल्हाधिकारी येरेकर यांनी अभियानात रस्ते, घरकुल पट्टेवाटप व स्मशानभूमी यांसारख्या गरजांवर भर दिला जाईल, असे सांगितले.कार्यक्रमात २७ स्वयंसहायता गटांना १.५० कोटींचे कर्ज वाटप व नागरिकांना शासकीय सेवा प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. ग्रामसभा यशस्वीपणे पार पडली. अभियानामुळे ग्रामपंचायती सक्षम होऊन ग्रामविकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



# पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा – ऐतिहासिक निर्णय घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

लेखपशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची अनेक पशुपालकांबरोबरच राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आग्रही मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी या मागणीला सकारात्मक पाठिंबा दर्शविला आणि पावसाळी अधिवेशनात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी हा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा लोकाभिमुख असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठ्या कृषिप्रधान राज्यांपैकी एक आहे. राज्यातील सुमारे ५५ टक्के लोकसंख्या थेट शेतीवर आणि संबंधित व्यवसायांवर अवलंबून आहे. शेतीसोबतच पशुपालन हे देखील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ७६.४१ लाख पशुपालक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढी-शेळीपालन, वराहपालन व तसेच पशुपालनाशी निगडित मूल्यवर्धित प्रकल्प यांसारख्या व्यवसायांना आता कृषी क्षेत्रातीलच सवलती व लाभ मिळणार आहेत.

**पशुपालन हे सामाजिक स्थैर्याचेही आधार**–भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून शेतकरी हा तिचा कणा मानला जातो. भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठ्या क्षेत्रांपैकी एक आहे, जे भारताच्या ११.६ टक्के पशुधनासह जगाच्या पशुधनात मोठा वाटा उचलते. ग्रामीण भागातील सुमारे ७० टक्के लोकसंख्या शेती व संलग्न व्यवसायांवर अवलंबून आहे, त्यामुळे पशुपालन, कुक्कुटपालन, मेंढी-शेळी पालन यासारखे व्यवसाय केवळ आर्थिक स्रोत नसून सामाजिक स्थैर्याचेही आधार आहेत.

**पशुपालनातून मिळणारे नियमित उत्पन्न–** हे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचे ठरते. ज्या भागांमध्ये पशुपालनाचा प्रसार अधिक आहे, तेथे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ७९ टक्क्यांनी घटल्याचे निदर्शनास आले आहे. याच कारणास्तव केंद्र सरकारने आत्महत्याग्रस्त भागात एकात्मिक शेती प्रणाली, मत्स्य व पशुपालन पॅकेज लागू केले आहे.केंद्रीय कुक्कुट संशोधन संस्था (आयसीएआर), च्या संशोधनानुसार, १.२५ हेक्टर जमिनीवर एकात्मिक शेती प्रणालीद्वारे सुमारे ५८,३६० रु. उत्पन्न आणि ५७३ दिवस रोजगार मिळतो. यातूनच शेतीसोबत पशुपालन केल्यास आर्थिक व सामाजिक स्थैर्य साधता येते, हे समोर आले आहे.

**कृषी क्षेत्राच्या उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा २४ टक्के वाटा**

महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे कृषिप्रधान राज्य आहे. राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच कृषीसंलग्न क्षेत्रे जसे पशुपालन, मत्स्यपालन तसेच फळफळावळ-भाजीपाला उत्पादनासारख्या पूरक क्षेत्रांशी जोडलेली आहे. कृषी हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, जे राज्याच्या अंदाजे ५० टक्के लोकसंख्येला रोजगार देते. महाराष्ट्रातील कृषीक्षेत्र हे ७-८ टक्के दराने वाढले आहे. महाराष्ट्राचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे ८-९ टक्के इतका आहे. महाराष्ट्र राज्याचा भारतातील सकल राष्ट्रीय उत्पन्नातील (ऋछ्ञ) वाटा अंदाजे १३ टक्के आहे.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले आहेत. यामध्ये कृषी व संलग्न या घटकाचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे. राज्याच्या सकल उत्पन्नात (जीडीपी) अवघ्या सहा जिल्ह्यांचा ५६ टक्के वाटा असून उर्वरित ३० जिल्ह्यांचा वाटा केवळ ४४ टक्के आहे. ही असमतोल स्थिती दूर करण्यासाठी पशुपालन हा आर्थिक समावेशनाचा महत्त्वाचा मार्ग ठरतो.

दुग्ध व्यवसाय, मेंढी-शेळी पालन आणि कुक्कुटपालन या व्यवसायांतून केवळ शेतकरीच नव्हे, तर संबंधित औषध, खाद्य, सेवा पुरवठादार कुटुंबांनाही उपजीविका मिळते. राज्यात १९५ लाख गोवंशीय व म्हशी आहेत, तर सुमारे १ कोटी शेळ्या व २६ लाख मेंढ्या आहेत. हे पशुधन शेकडो कुटुंबांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कुक्कुटपालनातही राज्य अग्रेसर असून ७.४ कोटी पक्षी नोंदणीकृत आहेत.



पशुपालन – केवळ पूरक नव्हे, तर स्वतंत्र आधारगेल्या काही दशकांत कृषी उत्पन्नात होणाऱ्या चढ-उतारांमुळे अनेक शेतकऱ्यांनी पशुपालनाचा आधार घेतला. गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कुक्कुटपालन, डुक्कर पालन यासारख्या व्यवसायांनी शेतकऱ्यांच्या घरातील रोजचा खर्च भागवण्यास हातभार लावला आहे. दुग्ध व्यवसायातून निर्माण होणारे उत्पादन, अंडी, मांस, लोकर, शेणखत या सर्व गोष्टींना बाजारात वाढती मागणी आहे.

निती आयोगाच्या अहवालानुसार पशुसंवर्धनाचा जीडीपीतील वाटा ४ टक्के असून तो वाढवण्यासाठी नियोजनबद्ध गुंतवणूक व धोरण राबवणे आवश्यक आहे. २०३० पर्यंत भारतात दूध, अंडी, मांस यांची मागणी अन्नधान्यापेक्षा अधिक असणार आहे. त्यामुळे पशुपालनाला धोरणात्मक महत्त्व देणे अपरिहार्य होते.

सद्यःस्थितीत दूध, अंडी व मांस यांचे उत्पादन व उपलब्धता विचारात घेता सन २०३० पर्यंत दूध, अंडी व मांस यांची एकूण मागणी १७ कोटी टन इतकी असून सदर मागणी तृणधान्याच्या मागणीपेक्षा अधिक आहे. पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पध्दतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असल्याकडेही निती आयोगाने लक्ष वेधले असून त्यावर उपाययोजना करुन शेतकऱ्यांची / पशुपालकांची आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली आहे. पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. पशुपालक व्यवसायास प्रोत्साहन देताना कृषी व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देणे हा महत्वाचा पर्याय होता. त्यामुळेच पशुंसवर्धनाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची भूमिका पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली.

> पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा देणं हा ऐतिहासिक निर्णय असून यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान होईल, शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७६ लाख कुटुंबे पशुपालन व्यवसायात असून त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. या निर्णयामुळे राज्यात पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती होईल.
> – **पंकजा मुंडे,** मंत्री, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

**पशुधनाची आकडेवारी–** महाराष्ट्रात सुमारे १ कोटी ९० लाख जनावरे असून त्यातील ८० टक्के ग्रामीण भागात आहेत. राज्याचे वार्षिक दुग्ध उत्पादन १ कोटी टनांहून अधिक असून त्यातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. पशुपालनातून सध्या २ कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पद्धतीने रोजगारात गुंतलेली आहे.

**पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यास होणारे फायदे : कृषी समकक्ष दर्जा** : पशुपालन व्यवसाय आता कृषी क्षेत्राशी समकक्ष मानला जाईल. वीज दरात सवलत : या निर्णयांमध्ये २५ हजार मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५० हजार अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमतेच्या तसेच ४५ हजार क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसायासाठी, १०० दुधाळ जनावरांचे संगोपन, ५०० मेंढी किंवा शेळीपालन आणि २०० वराह या पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी 'कृषी इतर' या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली.सौर ऊर्जा प्रकल्पासाठी अनुदान : कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**कर्जावरील व्याज दरात सवलत** : कृषीप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.ग्रामपंचायत करात एकसमानता : पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्यासाठी, कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते, त्याच दराने कर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली.अंमलबजावणीसाठी निधी : योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येणार.या निर्णयामुळे पशुपालक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात प्रत्यक्ष वाढ होईलच, पण औषध उत्पादक कंपन्या, खाद्य उत्पादक कंपन्या, दूध संकलक आणि प्रक्रिया उद्योग, विक्रेते, वाहतूकदार यांसारख्या अप्रत्यक्षपणे संबंधित व्यवसायांनाही चालना मिळणार आहे. तसेच यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊन अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होईल. महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासासाठी पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. हे केवळ आर्थिक स्थैर्यासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील गरीबी कमी करण्यासाठी आणि पर्यावरणीय शाश्वतता साधण्यासाठीही आवश्यक ठरणार आहे.शेती ही केवळ जमीन जोपासण्यापुरती मर्यादित न राहता, ती समग्र ग्रामीण जीवनशैलीचा भाग आहे. पशुपालन हा त्यातील एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक निर्णय नसून सामाजिक न्याय आणि समावेशक विकासाचा मार्ग आहे.हा दर्जा दिल्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यवधी पशुपालकांना मुख्य प्रवाहात आणता येईल आणि त्यातून महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादन, रोजगार निर्मिती, आणि ग्रामीण विकासाला नवे बळ मिळेल, यात शंका नाही.

**नंदकुमार बलभीम वाघमारे**
वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई




**सकाळी लवकर उठणं ही केवळ चांगली सवय नसून, आरोग्यासाठी नैसर्गिक औषध**

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

सकाळी लवकर उठणं ही फक्त शिस्तबद्ध सवय नाही, तर शरीरासाठी आणि मनासाठी नैसर्गिक औषध मानलं जातं. वैद्यकीय आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिलं तर सकाळचं वातावरण म्हणजे संपूर्ण शरीरासाठी 'ठशीर्शं' बटनसारखं आहे. त्यामुळे सकाळी लवकर उठणं हे मानवी आरोग्यासाठी नैसर्गिक औषधच आहे,




**१. डायबेटीस नियंत्रण सुधारते, वजन कमी होतेनिरोगी जीवनशैली**

सकाळच्या वेळेत शरीराची इन्सुलिन सेन्सिटिव्हिटी जास्त असते. त्यामुळे साखर अधिक प्रभावीपणे वापरली जाते. सकाळी चालणं आणि सौम्य व्यायाम केल्याने कमी होतो. लवकर उठून चालणं + पाणी + व्यायाम = रोजचं डायबेटीस नियंत्रण हे सूत्र नक्की लक्षात ठेवा.

**२. हृदयासाठी दिलासादायक सुरुवात**

सकाळी चालणं किंवा ध्यान करणं सक्रिय करतं. यामुळे रात्रीचा ताण कमी होऊन रक्तदाब आणि हृदयाचं आरोग्य सुधारतं. लवकर उठणं म्हणजे हृदयासाठी नैसर्गिक संरक्षण आहे.निरोगी जीवनशैली

**३. शरीराचं नैसर्गिक घड्याळ संतुलित होतं**

लवकर उठल्याने योग्य पद्धतीने कार्यरत राहतो. झोप, जेवण, औषधं यांचा वेळेवर परिणाम होतो. वेळेवर झोपणं-उठणं म्हणजे मजबूत रोगप्रतिकारक शक्ती असणे होय.

**४. मेंदू तल्लख आणि विचार स्पष्ट**

सकाळी उठल्यावर जास्त असते. यामुळे कमी होतो, आत्मविश्वास आणि मानसिक स्थैर्य वाढतं. रोज सकाळी अर्धा तास स्वतःसाठी देणे म्हणजेच मानसिक शांतता अनुभवणे.

**५. मूड, झोप आणि ऊर्जा संतुलित राहते**

सकाळी नैसर्गिक झाल्यास दिवसभर उत्साह टिकतो. रात्री योग्य वेळी वाढल्याने शांत झोप मिळते. लवकर उठणं म्हणजेच चांगली झोप आणि चांगलं आरोग्य होय. सकाळी लवकर उठणं म्हणजे आजारांचं प्रतिबंधक औषध आहे. औषधांपेक्षा रूटीनमध्ये बदल अधिक परिणामकारक ठरतो असे देखील तज्ज्ञांचे मत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १८ सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# मोर्शी संत्रा प्रक्रिया प्रकल्पाला दोन वर्षांची संजीवनी

## काही तरतुदींमध्ये सुधारणा करण्यास मिळाली मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती –** नागपूर, काटोल व कळमेश्वर, मोर्शी आणि संग्रामपूर येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रउभारण्याच्या योजनेस आणखी दोन वर्षांची मुदतवाढ मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली.

अमरावती, नागपूर, अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यांत संत्र्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. संत्रा फळाचे काढणी पश्चात नुकसान सुमारे २५ ते ३० टक्के आहे. हे नुकसान टाळण्यासाठी नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, संग्रामपूर येथे आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्यासाठी २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात २० कोटी रुपये निधीची घोषणा करण्यात आली होती.या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळे नोडल एजन्सी म्हणून काम करीतआहे. या केंद्रांसाठीच्या योजनेत ३९.९० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात प्रकल्प रद्द करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठीची रक्कम दीड कोटी रुपये दुय्यम प्रक्रिया प्रकल्पाकरिता वर्ग करण्यास



आला होता. आता या योजनेत सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेत २०२५-२६ आणि २०२६-२७ या दोन आर्थिक वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे.संत्र्याच्या उपपदार्थावरील मान्यता देण्यात आली असून, दुय्यम प्रकल्पाकरिता १ कोटी ५८ लाख रुपयांच्याखर्चास मान्यता देण्यात आली आहे. पूर्वी १६ दुय्यम प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली होती.

### संत्रा प्रक्रियेला गती देणार-कृषिमंत्री भरणे

विदर्भात संत्रा उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. मात्र प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे संत्र्याला दर मिळत नाही. त्यामुळे प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याचे धोरण राज्य सरकारने आखले आहे. त्यानुसार योजनेला दोन वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. आणखी अतिरिक्त खर्चालाही मान्यता देण्यात आली आहे. संत्रा प्रक्रिया योजनेला गती देण्याचे कृषी विभागाचे धोरण राहील, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

मात्र आता नागपूर, काटोल व कळमेश्वर (जि. नागपूर), मोर्शी (जि. अमरावती) आणि संग्रामपूर (जि. बुलढाणा) हे पाच दुय्यम प्रकल्पनिश्चित करण्यात आले आहेत.

या बाबत घेण्यात आलेल्या शासन निर्णयातील काही तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली. यापुढे असा प्रकल्प उभारण्यासाठी लाभार्थ्यांकडे स्वतःची किवा भाडेतत्त्वावरील किमान ३० वर्षे कालावधीकरिता जागा असणेआवशयक राहील. ती जागा शासनाकडे गहाण राहील. निश्चित प्रकल्पांच्या संख्येपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास निकषाची पूर्तता करणाऱ्या लाभार्थ्यांची निवड पणन मंडळ सोडतीद्वारे करेल, असे निश्चित करण्यात आले आहे.

## बनावट जन्मदाखले

# ४१ आरोपींवर १३०० पानांचे दोषारोपपत्र दाखल

### एसआयटी स्थापन झाल्यानंतर गुन्ह्याच्या तपासाला गती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती** शहरातील गाडगेनगर पोलिस ठाण्यात सुमारे सात महिन्यांपूर्वी बनावट जन्मदाखल्यांच्या प्रकरणात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. मात्र सात महिन्यानंतरही तपासात प्रगती नसल्यामुळे पोलिस आयुक्त अरविंद चाक्रीया यांनी आठ दिवसांपूर्वी गुन्हे शाखेचे एसीपी शिवाजी बचाटे यांच्या नेतृत्वात एसआटी स्थापन केली होती. त्यानंतर एसआयटीने मागील आठ दिक्सात या प्रकरणाच्या तपासाला गती देवून तो पूर्ण केला. इतकेच नाहीतर ४१ आरोपीविरुद्ध तब्बल १३०० पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. तहसीलमधून जन्म दाखले मिळवण्यासाठी शाळा सोडल्याच्या दाखल्यांमध्ये खोडतोड, अन्य बनावट कागदपत्रे जोडून जन्म दाखले मिळवल्याप्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात १८ फेब्रुवारीला




गाडगेनगर पोलिस ठाण्यात नोंद गुन्ह्यासह एकुण ५४ संशयित प्रकरणांची चौकशी केली होती. त्यासाठी युद्धपातळीवर विविध यंत्रणांशी पत्रव्यवहार करुन पडताळणी केली. त्यावेळी संशयित कागदपत्र आढळळेल्यांचा गुन्ह्यात

### संशयित कागदपत्रांची पडताळणी

बनावट जन्मदाखले प्रकरणाच्या तपासात आम्हाला तहसील कार्यालयाकडून संशयितांची कागदपत्रे दिली होती. त्या कागदपत्रांची सखोल पडताळणी केली. त्यामध्ये ज्यांच्या कागपत्रांमध्ये अनियमितता आढळली, त्यांचा गुन्ह्यात समावेश केला. तपास पूर्ण झाल्यामुळे ४९१ आरोपिंविरुद्ध सुमारे १३०० पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे.एसीपी शिवाजी बचाटे, एसआयटी प्रमुख,

सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. दरम्यान या प्रकरणाच्या सखोल व वेगवान तपासासाठी शहर आयुक्तालयस्तरावर एसआयटी स्थापन केली होती. एसीपी शिवाजी बचाटे यांच्या नेतृत्वातील एसआयटीने समावेश केला. एकंदरीत ७ महिने रखडलेल्या त्या तपासाला गती दिली. एसआयटीमध्ये पीआय बाबाराव अवचार, पीआय अतुल वर, पीआय समाधान वाठोरे, पीएसआय लोतडे यांचा समावेश होता.

**महानगरपालिका निवडणूक २०२९ :**

## प्रारूप प्रभाग रचना हरकती-आक्षेपांवर जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती-** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्धीनंतर दाखल झालेल्या हरकती व आक्षेपांवर आज सुनावणी घेण्यात आली. ही सुनावणी मा. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली व अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या उपस्थितीत सकाळी ११.०० वाजता महसूल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे पार पडली.प्रभाग रचना संदर्भात नागरिक, जनप्रतिनिधी व विविध सामाजिक संस्थांनी आपले हरकती व आक्षेप सादर केले. सादर झालेल्या निवेदनांची सुनावणी घेण्यात आली. यानंतर पुढील कार्यवाहीसाठी संबंधित प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यावेळी ४० लोकांची सुनावणी घेण्यात आली.यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त (प्रशासन) डॉ.मेघना वासनकर, सहाय्यक संचालक नगर रचना अधिकारी सागर वानखडे, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीचा शाळेत जाऊन विनयभंग

## वीस वर्षीय युवकावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अंजनगाव सुर्जी** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील रहीमापुर पोलीस स्टेशन अंतर्गत कापुसतळणी येथील निर्मला हायस्कुल येथे ईयत्ता सातवीत शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीचा २० वर्षीय युवकाने अल्पवयीन मुलीचा शाळेत जाऊन विनयभंग केल्याप्रकरणी युवकावर पोस्को अंतर्गत कारवाई करुन दि.१६ अटक करण्यात आली. कापुसतळणी सर्कल अंतर्गत एकटी राहणाऱ्या महीलेची मुलगी निर्मला विद्यालय कापुस तळणी येथे शिक्षण घेतात व स्कूलव्हनने दररोज शाळेत येणे जाणे करतात महीला राहत असलेल्या गावातीलच एका शेतकऱ्यांकडे गेल्या दोन वर्षापासुन प्रकाश कास्देकर कामाला असून प्रकाश पिडीतेचा पाठलाग व तिचे घराकडे चकरा मारीत असे, आरोपी प्रकाश यास यापुर्वी पिडी तेच्या आईने हटकलेही होते. आरोपी मुलीचा वारंवार पाठलाग करुन तीची इच्छा नसतांना तीच्या सोबत जवळीक निर्मान करण्याचा प्रयत्न नित्याचीच बाब असतांना दि.१६ रोजी दहा वाजता आरोपी प्रकाश कास्देकर व त्याचा अल्पवयीन मित्र (दोन्ही रा.उपातखेडा ता.चिखलदरा) यांनी परीसीमा ओलांडत पिडीतेची शाळा निर्मला हायस्कुल येथील वर्ग सातव्या गाठत वर्ग शिक्षकास मुलीची विचारपुस करुन तिच्या आईने घ्यायला पाठवले आसे सांगत मुलीस घेऊन जाण्याचा प्रयत्न केला वर्गशिक्षक यांना शंका आल्याने शिक्षकाने प्रसंगावधानता राखत घरी फोन लावला असता मुलीची आई व तिचे चुलत भाऊ यांनी पोलीसांना घडामोड कळवत शाळा गाठली असता शिक्षकाचे प्रसंगावधानता ,मुलीची आई व नातेवाईक पोहचल्याने, पोलीसांच्या सतर्कतेने पुढील अनर्थ टळला. रहिमपूर पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी आरोपी प्रकाश कासदेकर व त्यांच्या अल्पवयीन सहर्काय़ास ताब्यात घेतले असता पिडीतेच्या आईच्या तक्रीवरुन पोलीस स्टेशन रहीमापुर चिंचोली येथे आरोपी विरोधात पोस्को अंतर्गत ७५(१) ळ, ७५(२) ,७८(२) ,३(५) अन्वये गुन्हे दाखल करून सहकलम बाल लैंगिक प्रतिबंधाच्या नुसार आरोपी प्रकिश कास्देकर यास अटक करण्यात आली आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायलयाने आरोपीस चौदा दिवसाचे एमसीआर दिला असुन पुढील चौकशी ठाणेदार अनंत वडतकर यांच्या मार्गदर्शनात स.पो.नी. गजानन सोनवणे व पोलीस अधिकारी करत आहे .

### शाळेच्या परिसरात रोड रोमीओचा सुळसुळाट

निर्मला हायस्कुल येथील शाळेच्या परीसरात शाळा भरण्याच्या व सुटण्याच्य वेळेस रोडरोमीओंचा सुळसुळात असतो. शाळा व्यवस्थापन समितीच्या गलथान कारभारामुळे अशा घटना घडत असल्याचे नागरीकांमध्ये चर्चा आहे. शाळा व्यवस्थापन समीतीने यावर कडक उपाययोजना न केल्यास पुनःच याप्रकारच्या घटना घटण्याची शक्यता वर्तविल्या जात आहे.

## कबड्डी संघात खेळाडूंची संख्या वाढणार

### १२ ऐवजी १४ खेळाडू स्पर्धेसाठी मान्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अमरावती-** इंटर-युनिव्हर्सिटी स्पर्धांमध्ये आता कबड्डी संघात १२ ऐवजी १४ खेळाडूंना संधी मिळणार आहे. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (-खण) कडून यासंदर्भातील आदेश नुकताच जारी करण्यात आला.अमॅच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांनी दिलेल्या शिफारसीनुसार खेळाडूंची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे संघ व्यवस्थापन अधिक सशक्त होणार असून खेळाडूंची योग्य रोटेशन पद्धत राबविता येईल. तसेच, दुखापत झालेल्या खेळाडूंच्या जागी तत्काळ पर्याय उपलब्ध होऊन संघाच्या एकंदर कामगिरीत सुधारणा होईल, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.ही सुधारणा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून लागू होणार आहे. सर्व इंटर-युनिव्हर्सिटी कबड्डी स्पर्धांमध्ये १४ खेळाडूंच्या संघांना परवानगी मिळणार आहे.या निर्णयामुळे विद्यापीठ स्तरावरील कबड्डी स्पर्धांना अधिक चुरस येणार असून ग्रामीण भागातून उदयोन्मुख होत असलेल्या खेळाडूंना अधिक संधी मिळेल,



### परतवाड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

## रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८परतवाडा –** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त परतवाडा शहरात विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतून समाजसेवेचा संदेश देत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. हॉटेल मयुरी इन येथे भाजप जिल्हा




कार्यकारिणीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी सहभाग घेत रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येक रक्तदात्याला प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमात भाजप पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी तसेच भाजपा युवा मोर्चाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे यांनी शिबिराला भेट देत रक्तदात्यांचे आभार मानले आणि त्यांच्या या कार्याचे कौतुक केले.

## ई-पिंक रिक्षा उपक्रमातून महिलांना स्वावलंबनाची नवी दिशा-अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती** महिला बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पिंक ई-रिक्षा योजने अंतर्गत अंश महिला बचत गटातील लाभार्थी सुषमा गायकवाड यांना ई-पिंक रिक्षा मिळाला असून, या प्रसंगी अमरावती महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी स्वतः या रिक्षामध्ये बसून सवारीचा आनंद घेतला.यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी लाभार्थी महिलेची विचारपूस करत रिक्षा मिळविण्याची प्रक्रिया, आलेल्या अडचणी आणि पुढील रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर माहिती घेतली. त्या म्हणाल्या की, या माध्यमातून बचत गटातील महिलांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत असून, त्या स्वावलंबी बनण्यास शासनाचे मोलाचे सहाय्य मिळत आहे.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे आणि एन.यू.एल.एम.



विभाग प्रमुख धनंजय शिंदे यांच्या नेतृत्वाखाली या योजनेचा प्रसार व प्रसिद्धी करण्यात आली आहे. एन.यू.एल.एम. विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पिंक ई-रिक्षा योजना महिलांपर्यंत पोहोचून त्यांच्या आर्थिक सबलीकरणास हातभार लागत आहे.या उपक्रमामुळे अमरावती शहरात महिला सक्षमीकरणाला नवी चालना मिळत असून, महिलांना स्वावलंबनाच्या प्रवासात एक पाऊल पुढे टाकण्याची संधी प्राप्त होत आहे.-

## 'सेवा पंधरवडा' निमित्त उद्याला विभागीय महसूल परिषद



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८अमरावती-** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती ०२ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीमध्ये सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त १९ सप्टेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या संकल्पनेतून विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांची एकत्रित महसूल परिषद आयोजित करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाच्यावतीने आयोजित या अनोख्या परिषदेमध्ये प्रामुख्याने तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून महसूल अधिकाऱ्यांसाठी विविध प्रशासकीय कार्यांचे सुलभीकरण तसेच प्रशासनातील कार्यप्रवाहाची सुधारणा होण्यासाठी मार्गदर्शन केल्या जाणार आहे.या परिषदेत भुसंपादन व पुनवर्सन, पाणंद रस्ते विषयक मोहिम, जिआयएस टॅगींग, जीओ फेन्सींग, लँड बँक, रोकड नोंदवही हाताळणे, जमीन वाटप प्रकरणे, शर्तभंग प्रकरणे, अर्धन्यायिक प्रकरणे, सादरकर्ता अधिकाऱ्यांचे कर्तव्य व जबाबदाऱ्या आदी संदर्भात तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केल्या जाणार आहे. तसेच ई-गव्हर्नन्स अंतर्गत अमरावती विभागात राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती या परिषदेत महसूल अधिकाऱ्यांना दिली जाणार आहे. ही परिषद विभागातील सर्व महसूल अधिकाऱ्यांकरिता त्यांच्या करिअरला अधिक समृद्ध करणारी ठरणार आहे. त्यामुळे या परिषदेला विभागातील सर्व महसूल अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.

# अभियानाचा उपयोग गावाच्या विकासासाठी करावा - विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल





**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

राज्य शासनातर्फे गावाच्या विकासासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. या प्रामुख्याने ग्रामस्तरावरील आत्मनिर्भरता निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. यात नागरिकांचा सक्रीय सहभाग राहणार असल्याने या अभियानाचा उपयोग गावाच्या विकासासाठी करावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा विभागीयस्तराचा शुभारंत उत्तमसरा, ता. भातकुली येथे आज पार पडला. तसेच स्वच्छताही सेवा उपक्रम, राष्ट्रीय पोषण माह, सेवा पंधरवडा या उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, परिविक्षाधिन अधिकारी कौशल्या एम., उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे, उपायुक्त राजीव फडके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास, गटविकास अधिकारी तुषार दांडगे, सुनिल राणा, सरपंच धमेंद्र मेहरे आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. सिंघल म्हणाल्या, गावांना समृद्ध पंचायत राज अभियानात चांगले काम करून बक्षीस जिंकण्याची संधी आहे. या अभियानात गावाला सुंदर करावे. सेवा पंधरवड्यात प्रामुख्याने शेतरस्ते मोकळे करण्यात येणार आहे. याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा. तसेच घरकुलासाठी अभियान राबविण्यात येणार आहे. त्यामुळे येत्या काळात एकही जण बेघर राहणार नाही. यासाठी होणाऱ्या सर्व्हेक्षणामध्ये नाव नोंदणी करावी. जिल्ह्यात गाव तेथे स्मशानभूमी व्हावी, यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. यात गावांना प्राधान्याने जागा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. तसेच सशक्त नारी अभियानातून महिलांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी अभियानात निश्चित केलेल्या मानकानुसार कार्य केल्यास अभियानात बक्षीस जिंकण्याची संधी आहे. राजस्व अभियानात शेतरस्ते, घरकुल, सातबारा आदी क्षेत्रात कार्य करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. सामान्य महसुली बाबी आणि भटक्या विमुक्तांसाठी विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानात राज्यभरातील चांगल्या ग्रामपंचायतींशी स्पर्धा होणार आहे. त्यामुळे गावाने एकत्रित प्रयत्नांनी उत्साहात या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी, अभियान राबविण्यासाठी लोकसहभाग महत्वाचा आहे. प्रत्येकाने अभियानात योगदान दिल्यास राज्यस्तरावर यश मिळणे शक्य होईल. महिलांसाठी पोषण अभियान राबविण्यात येत असले तरी यात पुरूषांनी सहभागी व्हावे. तसेच स्वच्छताही सेवा आणि स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानात महिलांनी आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन केले.

यावेळी फुलंब्री, जि. छत्रपती संभाजी नगर येथील राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. तसेच उमेदच्या २७ बचतगटांना दिड कोटी रूपयांचा धनादेश वितरीत करण्यात आला. तसेच सातबारा, शिधापत्रिका, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सरपंच धमेंद्र मेहरे यांनी प्रास्ताविक केले.

# सुलभाताई.. तुम जियो हजारो साल... तमाम स्नेहीजनांमध्ये उमटला एक सूर

## वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यासाठी गाडगेनगर येथील निवासस्थानी स्नेहीजनांची मोठी उपस्थिती





**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

अमरावती जिल्ह्याच्या समाजकारण ,राजकारण व सहकार क्षेत्रात अग्रणी व सक्रिय असलेल्या आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांच्या आज १८ सप्टेंबर रोजी वाढदिवसाला त्यानां भरभरून शुभेच्छा देण्यासाठी गाडगे नगर स्थित निवासस्थानी स्नेहीजन व हितचिंतकांची मोठी गर्दी उसळली होती . आपल्या लाडक्या सुलभाताईंचे अभिष्टचिंतन करण्यासह तुम जियो हजारो साल..अशा शब्दात स्नेंहिजणांनी आपल्या लाडक्या लोकनेत्याविषयीचा आदरभाव प्रकट केला. याप्रसंगी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सर्वांची भेट घेऊन, संवाद साधून , शुभेच्छाचा स्वीकार करून आपल्या माणसांच्या कायम ऋणानुबंधाच्या सानिध्यात राहणार असल्याची कृतज्ञता व्यक्त केली.

जनसेवेचा वसा जोपासत अमरावतीकर जनतेला न भूतो न भविष्यती अशा विकासाची अनुभूती करून देऊन अमरावतीच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या जननायिका आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या वाढदिवसा निमित्य सर्वच क्षेत्रातील नागरिकांनी एकच गर्दी केली. आपल्या लाडक्या लोकप्रतिनिधींचे वाढदिवसा निमित्य अभिष्टचिंतन करण्यासह त्यांना भावी उज्वल वाटचालीच्या शुभेच्छा देण्यासाठी तमाम मंडळींची भरगच्च उपस्थिती दिसून आली. या प्रसंगी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सर्व स्नेहीजनांच्या शुभेच्छांचा आदरपूर्वक स्वीकार करून सर्वांचे धन्यवाद व्यक्त केले.


अमरावती जिल्ह्याच्या समाजकारण ,राजकारण व सहकार क्षेत्रात अग्रणी व सक्रिय असलेल्या आ.सौ.सुलभाताई खोडके या व्यापक जनसंपर्काच्या धनी असून सर्वच क्षेत्रातील मान्यवरांमध्ये त्यांची विशेष लोकप्रियता व आवड आहे. पद, प्रतिष्ठा,पक्ष ,जाती,धर्म,पंथ बाजूला ठेवून केवळ आपल्या माणसासोबत आपण नेहमी विश्वासाने उभे राहिले पाहिजे, त्यांना खऱ्या अर्थाने साथ दिली पाहिजे हाच स्वभावगुण सुलभाताईंनी प्रत्यक्षामध्ये अंगिकारला असल्याने आज त्या अमरावतीकरांच्या हृदयावर अधिराज्य गाजवीत आहे. याचीच प्रचिती त्यांच्या वाढदिवसाला बघायला मिळाली. आपल्या लाडक्या सुलभाताईना वाढदिवसानिमित्य उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो, व त्यांची भावी वाटचाल अधिक सुखमय व समृद्धमय होवो,,हीच मनोकामना मनी बाळगून स्नेहीजनांनी आमदार महोदयांवर शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी आमदारताईंचे स्वागत ,सत्कार व अभिष्टचिंतन करण्यासाठी दिवसभर स्नेहीजनांचा ओघ आवरत नव्हता.

जनतेची साथ, विश्वास व आशीर्वाद हीच आपली काम करण्याची ऊर्जा असून यातूनच आपल्याला नवनवीन आव्हाने पेलण्याचे धाडस व सामर्थ्य

लाभत आहे. कुठलेही काम करतांना आपल्या माणसांना विश्वासात घेणे महत्वाचे असल्याने त्यांच्याच विश्वासाच्या जोरावर व आशीर्वादाने मी आज इथपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे आपण आपल्या माणसांच्या कायम ऋणानुबंधनात राहणार असल्याची कृतज्ञता आ.सुलभाताई खोडके यांनी व्यक्त यावेळी व्यक्त करीत सर्व स्नेहीजन व हितचिंतकांचे आभार व धन्यवाद व्यक्त केले.

# हैदराबाद गॅझेटसाठी आता कोळी महादेव समाजही आक्रमक

## हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे निघणार मोर्चा : दर्यापूर येथील बैठकीत निर्णय




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८भामोद**

मराठा समाजाच्या मागण्या मान्य करित हैद्राबाद गॅझेटनुसार अंमलबजावणी करण्याचा निर्णय झाला आहे. यानंतर आता महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी या समाजालाही हैदराबाद गॅझेट लागू करावा. तसेच एसटी प्रवर्गामधून आरक्षणाची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी दर्यापूर येथे नुकताच कोळी समाजाची बैठक झाली.

देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी सत्तेत आल्यास कोळी महादेव समाजाला आरक्षण देण्यासाठी निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे आता ते आश्वासन पूर्ण करावे, यासाठी मुख्यमंत्र्यांकडे मागणी करण्यात येणार आहे. तसेच यासाठी येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात कोळी महादेव समाजाच्या वतीने विशाल बगाडे यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात येणार असून, उपोषणही करण्यात येणार आहे. हैदराबाद गॅझेटमध्ये कोळी असा उल्लेख आहे; मात्र हा कोळी म्हणजे महादेव कोळी आणि मल्हार कोळी असल्याने महादेव कोळी समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करणे अपेक्षित आहे; परंतु विदर्भातील महादेव कोळी समाजाला सरकार जाणीवपूर्वक खोटे आश्वासन देत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. या बैठकीत रघुनाथ इंगळे, गोविंद बोपटे, यादवराव टापरे, सतीश घाटे, योगेश बुंदे, अनिल पुंडकर, रामेश्वर बुंदे, पंकज राणे, बंडू जामनेकर, विलास तडी, अनिल कळस्कर, गणेश भगत, सत्यपाल तेलंग, साहिल ब्रह्मखेडे आदी उपस्थित होते.

# दर्यापूर तालुक्यात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे केले वाटप

## कान्होली, थीलोरी, गायवाडी पनोरा शाळेच्या विद्यार्थ्यांचा समावेश




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८दर्यापूर**

मुंबई येथील नितीन दळवी यांच्या सहयोगातून व गाडगे महाराज आदिवासी आश्रम शाळा श्री क्षेत्र नागरवाडीचे प्रमुख बापूसाहेब देशमुख यांच्या संकल्पनेतून दर्यापूर तालुक्यातील विविध गावातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप एकाच दिवशी करण्यात आले. सर्वप्रथम सुरवातीला सकाळी कान्होली येथील शाळेत शालेय साहित्य वाटपाचा शुभारंभ गाडगे महाराज मिशनचे बापूसाहेब देशमुख यांच्या हस्ते तर गजानन देशमुख, ढोरे, सागर देशमुख आदींच्या प्रमुख उपस्थितीत केला. या वेळी शंभर विद्यार्थ्यांना शालेय साहित्य त्यामध्ये नोटबुक, ड्रॉइंग बुक, पाच पेन, पेन्सिल, खोडरबर, बिस्किट पुडा, चॉकलेट वितरीत केले. विशेषतः खिचडी शिजवणाऱ्या महिलेचा सन्मान म्हणून तिला साडीचोळी देण्यात आली.

दरम्यान दुपारी थीलोरी येथील स्वर्गीय झामाजी वाकपांजर विद्यालयातील मुलांना वाटप करून त्याच ठिकाणी संस्थेतर्फे भोजन दिले. गायवाडी, पनोरा, रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर येथील शिक्षक मुख्याध्यापक शिक्षिका कर्मचारी यांच्यावतीने बापूसाहेब देशमुखांसह उपस्थित गाडगे महाराज मिशनच्या सर्व लोकांचा सत्कार मुख्याध्यापक हेमंत रेचे यांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित २०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. याप्रसंगी श्री क्षेत्र नागरवाडीचे शिक्षक अतुल रेडे यांनी पंजाबराव देशमुख व गाडगे महाराजांचं अतूट नातं असलेले गीत सादर केले. त्यानंतर श्री संत गाडगे महाराज बालगृह बनोसा येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा समारोपीय कार्यक्रम झाला. संत गाडगेबाबांच्या कार्याचा प्रसार आणि प्रचार व्हावा म्हणून प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांना गाडगेबाबांची आकर्षक व सुंदर अशी मूर्ती देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. दर्यापूर तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. मुंबईतील नितीन दळवी यांचे सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी आभार व्यक्त केले. संत गाडगेबाबांच्या आवडत्या गोपाला गोपाला भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पांढुर्णा चौकात भीषण अपघात महिलेचा मृत्यू, मुलगा जखमी

## अपघातानंतर नागरिकांचा ट्रकचालकाला चांगलाच धडा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८वरूड**

शहरातील अत्यंत गजबजलेल्या पांढुर्णा चौकात बुधवार ता. १७ ला सायंकाळी ५:३० वाजताच्या दरम्यान भीषण अपघात घडला. या अपघातात सौ. निकिता राहुल उघडे (वय २८, रा. रामनगर, वरूड) या महिलेचा जागीच मृत्यू झाला असून त्यांचा लहान मुलगा जखमी झाला आहे. मुलगा सुदैवाने बचावला असला तरी या घटनेने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.




प्राप्त माहितीनुसार, सौ. निकिता उघडे आपल्या मुलाला घेऊन काही कामानिमित्त पांढुर्णा चौकातून जात होत्या. दरम्यान, समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की निकिता यांचा जागीच मृत्यू झाला. मुलगा किरकोळ जखमी झाला आहे. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी केली. ट्रकचालक पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना नागरिकांनी त्याला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालय, वरूड येथे पाठविला.

दरम्यान, मृतदेहाचा शवविच्छेदनानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. गुरुवारी दुपारी २:०० वाजता डवरगाव रस्त्यावरील स्मशानभूमीत निकिता उघडे यांच्या अंत्यसंस्कारास भावपूर्ण वातावरणात मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. प्रत्येकांच्या डोळ्यांतून अश्रू वाहताना दिसले. या अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त केला. पांढुर्णा चौकात वारंवार अपघात घडत असून वाहतुकीकडे प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. ट्राफिक पोलीस व सिग्नल व्यवस्था तातडीने करावी, अन्यथा यापुढे मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला. घटनेचा पुढील तपास वरूड ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहेत.

# अक्षर मानवतर्फे 'विद्यार्थी संवाद' कार्यक्रम यशस्वी ओझोन जनजागृतीदिनी प्रेरणादायी मार्गदर्शन




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ कारंजा**

अक्षर मानव अमरावती व वर्धा जिल्हा कार्यकारिणीतर्फे श्री. सोमनाथ विद्यामंदिर, उमरी येथे 'विद्यार्थी संवाद' कार्यक्रम आणि शाळेच्या ४३व्या वर्धापन दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ओझोन जनजागृती दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती व संवाद कौशल्य वाढीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात महाराष्ट्राचे राज्य संघटक तथा विदर्भाचे पालकमंत्री मा. आझाद जमा खान यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी प्रेरणादायी संवाद साधला. विशेष पाहुण्या म्हणून समुपदेशक प्रांजली आत्राम व जिल्हा सचिव अश्विनी वितोंडे-खान यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी अरुणराव ढोले सर होते.

या कार्यक्रमात वक्तृत्व स्पर्धा, भक्तीगीत स्पर्धा यांचे बक्षीस वितरण करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, ध्येय निर्धारण व संवाद कौशल्यावर मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक राजकुमार तिरभाने व त्यांच्या सहकार्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मलकापूरजवळ भीषण अपघात चार ठार, पाच गंभीर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८बुलढाणा**

जिल्ह्यातील मलकापूरजवळ राष्ट्रीय महामार्गांवर एक कार ट्रेलरवर धडकून झालेल्या भीषण अपघातात चार ठार तर पाच प्रवासी गंभीर जखमी झाले. मृतकमध्ये वाहन चालकाचा समावेश असून घटनेतील अन्य ३ मृतकांची ओळख पटू शकली नाही. १७ सप्टेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

मुक्ताइनगरकडून मलकापूरकडे जाणा-या या रोडवर ही भीषण दुर्घटना घडली आहे. दुर्घटनेत कार चालक साजिद अजीज बागवान यासह तीन महिला अशा चौघाचा जागीच मृत्यू झाला. हे प्रवासी मारूती ईको कारने (क्र. एम एच ४६ एक्स ३१२०) प्रवास करीत होते. दरम्यान चालक साजिद अजीज बागवान याचे नियंत्रण सुटल्याने कार भरधाव वेगात समोर असलेल्या मोठ्या ट्रेलरला पाठीमागून धडकली.

गंभीर जखमी मध्ये संतोष तेजराव महाले वय ४० वर्ष राहणार चिखली तालुका मुक्ताईनगर, जिल्हा जळगांव, पंकज दिलीप गोपाळ वय २२वर्ष राहणार नांद्रा हवेली, तालुका जामनेर, जिल्हा जळगांव,दीपिका विश्वास वय ३० वर्ष कलकत्ता पष्चिम बंगाल, टीना अजय पाटील, वय ४५ वर्ष राहणार भुसावळ जिल्हा जळगाव यांच्या समावेश आहे.

एका जखमी महिलेची ओळख पटू शकली नाही. जखमी वर उपचार सुरु असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे समजतेया प्रकरणी मलकापूर येथील दसरखेड एमआयडीसी पोलिसांनी चौघाच्या मृत्यूस कारणीभूत चालकविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास ठाणेदार हेमराज कोळी ठाणेदार करीत आहे.

# राजापेठ उड्डाण पुलावर लागले ऑन लाईन स्पीड सेन्सिंग रडार

## २० किमी राहणार ताशी मर्यादा; पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती इर्विन ते राजापेठ उड्डाणपुलावर ऑनलाइन 'स्पिड सेन्सिंग रडार' उभारण्यात येणार आहे. त्या पायलट प्रोजेक्टच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली असून, त्यात श्याम चौक भागातील उड्डाणपुलावर १७ सप्टेंबर रोजी दोन कॅमेरे तथा स्क्रिन लावण्यात आली आहे.




उड्डाणपुलावरील बेदरकार वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण व मनपाच्या ना हरकतीनंतर आगामी १५ दिवसांमध्ये ते ऑनलाइन 'स्पिड सेन्सिंग रडार कार्यान्वित होईल. यातून वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांचे चित्र कॅप्चर करून संकलित डेटाच्या आधारे वाहनचालकांना ऑटोमेंटिक ई-चालान पाठविले जाणार आहेत. सीपी अरविंद चावरिया यांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे. रेल्वे उड्डाणपूल पादचाऱ्यांसह सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद करण्यात आल्याने शहरातील उड्डाणपुलांवरील वाहनांचे आवागमन वाढले आहे.

**२० किमी. ताशी मर्यादा**

ऑनलाइन स्पीड रडार ही डिजिटल स्क्रिन आहे, जी चालकाला त्यांचा त्यावेळीचा वेग सांगेल. जर वेग निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त झाला तर नाइट व्हिजन कॅमेरा असलेले रडार आपोआप अतिवेगाने धावणाऱ्या वाहनाची प्रतिमा क्लिक करेल आणि ती वाहतूक मुख्यालयात पाठवेल. अशा प्रकारे उल्लंघन करणाऱ्यावर मोबाइलवर ई-चालान पाठवले जाईल. उड्डाणपुलावरची मर्यादा ही तासी २० किमी अशी आहे. ते तशी फलके लावण्यात येणार आहे.

**...अशी राहणार रडार यंत्रणा**

वेग नियंत्रणासाठी वापरल्या - जाणाऱ्या 'रडार' प्रणालीमध्ये रेडिओ लहरींच्या मदतीने वाहनांचा वेग अचूकपणे मोजला जातो. रडार हे तंत्रज्ञान एका वस्तूकडून परतणाऱ्या लहरींमधील वारंवारता बदल मोजून, डॉपलर इफेक्टच्या तत्त्वावर वस्तूचा वेग निश्चित करते. वाहतूक पोलिसांद्वारे है उपकरण वाहनांचा वेग तपासण्यासाठी आणि वाहतूक नियंत्रणासाठी वापरले जाते.

# राज्य सरकारला शेतकऱ्यांची जमीन हवी, म्हणूनच शेतमालाला हमीभाव नाही - राकेश टिकैत यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

देशात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या विदर्भात होत असून मागील आठ महिन्यांत तब्बल १५०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे शेतकरी अडचणीत सापडल्याचा आरोप करण्यात येतो आहे.

या पार्श्वभूमीवर अमरावतीत 'कापूस अभ्यासक आणि शेती तज्ज्ञ संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या संवादात देशभरातील मान्यवर शेतकरी नेते आणि तज्ज्ञ सहभागी झाले. यामध्ये भारतीय किसान युनियनचे नेते राकेश टिकैत, शेती अभ्यासक अशोक ढवळे, शेतकरी नेते अजित नवले, आणि राजन क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतकरी आत्महत्यांची वाढती संख्या, हमीभावाचा अभाव, वीज दरवाढ, पीक विम्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी, आणि शेतमाल विक्रीतील अडचणी या विषयांवर यावेळी सखोल चर्चा झाली.

राकेश टिकैत यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप करत सांगितले की, सरकार शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहे. शेतमालाला हमीभाव न देण्यामागे हेतू आहे - सरकारला शेतजमीन खाजगी कंपन्यांना द्यायची आहे. टिकैत यांनी स्पष्टपणे म्हटले की, शेतकऱ्यांना अडचणीत टाकून त्यांची जमीन कवडीमोल भावात खरेदी करण्याचा डाव सुरू असल्याचे ही टिकेत म्हणालेत.

# प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेतर्गत लोककल्याण मेळावा - फेरीवाल्यांनी घ्यावा जास्तीत जास्त लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वानिधी) योजनेअंतर्गत अमरावती महानगरपालिकेतर्फे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत लोककल्याण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वानिधी) योजनेअंतर्गत अमरावती महानगरपालिकेतर्फे दिनांक १७ सप्टेंबर,२०२५ रोजी लोककल्याण शिबिर सुरु झाले असून सदर शिबिराला नागरिकांचा उत्फुर्तपणे प्रतिसाद मिळत आहे.या शिबिरामध्ये फेरीवाल्यांना पीएम स्वानिधी अंतर्गत नवीन कर्जाकरिता अर्ज




भरण्याची सुविधा उपलब्ध असून, १० हजार रुपयांचे कर्ज फेडलेल्या लाभार्थ्यांना पुढील टप्प्यात २५ हजार रुपयांचे कर्ज मिळणार आहे. तसेच तृतीय टप्प्यात ५० हजार रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध होणार आहे.या लोककल्याण मेळाव्यात पीएम स्वानिधी व्यतिरिक्त इतर ८ शासकीय योजनांचा लाभ देखील फेरीवाल्यांना मिळणार आहे. तसेच बँकांनी णडइ कडे परत केलेल्या अर्जांचे निकालीकरण, मंजूर कर्जाचे वितरण, डिजिटल ऑनबोर्डिंग प्रक्रिया, एफएसएसएआयच्या सहकार्याने अन्न प्रशिक्षण, तसेच पथविक्रेत्यांचे सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण या महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध राहतील.या योजनेचे उद्दिष्ट पथविक्रेत्यांना व्यवसायासाठी खेळते भांडवल उपलब्ध करून देणे, नियमित परतफेडीस प्रोत्साहन देणे आणि डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे आहे. योजनेला मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ मिळालेली असून पात्र लाभार्थी नव्या अर्जासाठी सुविधा केंद्र तसेच एन.यू.एल.एम. विभाग, राजापेठ, झोन क्र. २ कार्यालयात संपर्क साधू शकतात.अमरावती शहरातील सर्व पात्र फेरीवाल्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

**शिबिराचे मुख्य लाभ**

पीएम स्वनिधी योजनेत नवीन अर्ज स्वीकारणेमंजूर कर्ज वितरण प्रक्रिया सुलभ करणेडिजिटल व्यवहार व ऑनबोर्डिंग प्रक्रियेचे मार्गदर्शनएफएसएसएआयमार्फत अन्नपदार्थ प्रशिक्षण८ शासकीय योजनांचा एकत्रित लाभआवश्यक कागदपत्रे:आधार कार्ड, बँक पासबुक, व्यवसायाचा फोटो, रेशन कार्ड, ई-श्रम कार्ड

# गुन्हेगारांवर नियंत्रणासाठी आता 'त्रिनेत्र'

## 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर, देशातील पहिलाच प्रकल्प अकोल्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अकोला**

एकच गुन्हेगार वारंवार गुन्हे करून समाजासाठी घातक ठरत असतो. त्यामुळे गुन्ह्यांचा आलेख चढत जाऊन सातत्याने गुन्हे घडतात. या अट्टल गुन्हेगारांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांचा मागावा घेण्यासाठी अकोला पोलीस दलाने त्रिनेत्र प्रणाली विकसित केली. 'एआय' तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे तयार करण्यात आलेला देशातील या प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प ठरला आहे. गेल्या १० वर्षांतील दोन हजारावर गुन्हेगारांच्या माहितीचे अद्ययावतीकरण झाले.

त्या गुन्हेगारांवर लक्ष ठेऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जाणार असल्याने गुन्हेगारी झपाट्याने कमी होईल, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिली.



पथदर्शी प्रकल्प म्हणून पालकमंत्री ड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते 'त्रिनेत्र'चे लोकार्पण करण्यात आले. सुमारे ७० टक्के गुन्हेगार अनेकवेळा गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतात. गुन्ह्यात पकडल्यावर न्यायालयाद्वारे गुन्हेगारांना शिक्षा होते. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाते. मात्र, कारागृहातून बाहेर आल्यावर ते पुन्हा गुन्हेगारी कृत्याकडे वळतात. या अट्टल गुन्हेगारांवर लक्ष ठेऊन त्यांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून परावृत्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे गेल्या १० वर्षांत जिल्ह्यातील २३ पोलीस ठाण्यांतर्गत वारंवार गुन्हे करणारे किंवा दोन किंवा दोनपेक्षा जास्त गुन्हे नोंद असलेल्या गुन्हेगारांच्या माहितीचे संकलन करण्यात आले. त्याचे वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये वर्गीकरण केले.

गुन्ह्यांसह गुन्हेगारांची इतर माहिती एकत्रित करून त्रिनेत्र प्रकल्पाच्या अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे त्यावर प्रकिया केली जात आहे. ती माहिती संबंधित पोलीस ठाण्यांना पाठवून त्या गुन्हेगारांवर प्राधान्याने लक्ष ठेवण्याचे सूचित करण्यात आले. अट्टल गुन्हेगारांचा मागोवा ठेवता येणे शक्य होणार आहे. परिणामी, भविष्यात घडणारे गुन्हे रोखता येतील. शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यात मदत होईल. 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करून प्रथमच गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'त्रिनेत्र' प्रणाली तयार झाली. गुन्हेगारी रोखण्यासाठी ही प्रणाली निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी व्यक्त केला.


**गुन्हेगारांचे पुनर्वसन होणार**

वारंवार गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांवर लक्ष ठेऊन त्यांची पार्श्वभूमी जाणून घेतली जाणार आहे. ते गुन्हेगारी प्रवृत्तीकडे का वळले? याची माहिती घेतली जाईल. थोड्या पैशांसाठी सुद्धा गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडतात. सामाजिक संस्थांच्या मदतीने गुन्हेगारांचे समुपदेशन केले जाणार आहे. पुनर्वसन करण्यासाठी त्यांना नोकरी मिळवून देण्याचे सुद्धा प्रयत्न केले जातील, असे अर्चित चांडक यांनी सांगितले.

# पाच दिवसांत दोनदा अप्परवर्धा धरणाची १३ दारे उघडली; नदीपात्रात मोठा विसर्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मोर्शी**

अप्परवर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे धरण जलाशय झपाट्याने भरत आहे. त्यामुळे १७ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता धरणाचे १३ पैकी १२ दरवाजे ५० सेंटीमीटरने उघडण्यात आले असून १०५० घनमीटर प्रतिसेकंद वेगाने



पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

याआधी १२ व १३ सप्टेंबर रोजीही धरणाची सर्व १२ दारे ४० सेंटीमीटरने उघडण्यात आली होती, त्यावेळी ८४४ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता. अवघ्या पाच दिवसांत धरणाची सर्व दारे दुसऱ्यांदा उघडली गेली आहेत.धरणात पाण्याची पातळी ३४२.३७ मीटरवर पोहोचली असून धरण ९७.३९ टक्के भरले आहे. मध्यप्रदेशातील जाम नदी आणि सालबर्डी परिसरातील माझ्नदीला पूर आल्यामुळे धरणात पाण्याची आवक वाढत आहे.वर्धा नदीच्या पातळीत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता धरण प्रशासनाने जलाशय प्रचलन सूचीनुसार पाण्याचा विसर्ग वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.धरणाचे सर्व दरवाजे उघडल्याने निर्माण झालेल्या नजाऱ्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोर्शी व आष्टी पोलिसांनी धरण परिसरात बंदोबस्त तैनात केला आहे.

# हैदराबाद गॅझेटविरोधातील जनहित याचिका हायकोर्टाने फेटाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट संदर्भात काढलेल्या अध्यादेशाला आव्हान देणारी याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली असून, कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. वकील विनीत धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे. पण या याचिकेतील मुद्दे आणि मागणी पाहता व्यापक जनहित दिसत नाही. त्यांना जीआरवर आक्षेप असेल त्यांनी स्वत:ची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असे म्हणत मुंबई हायकोर्टाने ही याचिका फेटाळली.

राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या हैदराबाद गॅझेटच्या अध्यादेशामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, यामुळे ओबीसी आरक्षणावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे अध्यादेशावर आक्षेप घेत दोन जनहित याचिका मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी वकील विनीत धोत्रे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. हा मराठा समाजासाठी मोठा दिलासा समजला जात आहे.

# घटस्फोटाचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्यात दहा ठिकाणी सुरु होणार प्री-मॅरेज काउन्सिलिंग सेंटर - रूपाली चाकणकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर**

कुटुंबातील विवाहित जीवन अधिक सुदृढ आणि समजूतदार बनवण्यासाठी राज्य महिला आयोगाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आयोगाच्या पुढाकाराने राज्यात १० ठिकाणी प्रायोगिक तत्वावर 'प्री-मॅरेज काउन्सिलिंग सेंटर' सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी येथे दिली.

राज्य महिला आयोगाच्या सुनावणीसाठी त्या नागपुरात आल्या असा नियोजन भवन येथे आयोजित पत्रपरिषदेत बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ, विपीन इटनकर, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार प्रामुख्याने उपस्थित होते.

चाकणकर म्हणाल्या की, लग्नपूर्व समुपदेशनाच्या माध्यमातून युवक-युवतींना वैवाहिक आयुष्याचे भावनिक, मानसिक आणि सामाजिक पैलू समजावून सांगण्यात येतील. या केंद्रांमुळे विवाहानंतर

**राज्य महिला आयोगाचा पुढाकार**




उद्भवणाऱ्या अनेक समस्यांना प्रतिबंध करता येईल आणि घटस्फोटाचे प्रमाण कमी होईल, अशी अपेक्षा आहे. सुरुवातीला राज्यातील पुणे, छत्रपती संभाजीनगर, मुंबई नाशिक आदी दहा निवडक जिल्ह्यांमध्ये हे केंद्र सुरू करण्यात आले आहेत. ही केंद्र विधि सेवा केंद्रामध्ये आहेत. तेथे तज्ज्ञांद्वारे समुपदेशन केले जाणार आहे.

राज्य महिला आयोगातर्फे प्रत्येक जिल्ह्यात सुनावणी घेतली जात आहे. आयोगाकडे येणाऱ्या राज्यभरातील तक्रारींचा विचार केला तर नागपूर विभागात तुलनेने कमी तक्रारी आहेत. नागपूर विभागातील भरोसा सेल व वन स्टॉप सेंटरचे काम चांगले असल्यानेच या तक्रारी कमी असल्याचे चाकणकर म्हणाल्या.

राज्य महिला आयोगाच्या सुनावणीसाठी त्या नागपुरात आल्या असा नियोजन भवन येथे आयोजित पत्रपरिषदेत बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ, विपीन इटनकर, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार प्रामुख्याने उपस्थित होते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत